# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 251/2022 दिनांक : 26.06.2022**

## 1)घरफोडी :–

**भोकर :–**दिनांक 25.06.2022 रोजी 12.00 वा. ते 15.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी प्रफुल्लनगर चिखलवाडी भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी ची पत्नी हि घराला कुलूप लावून तिच्या मुलीकडे कार्यक्रमाला गेले असता घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन घरातील सोन्या चादीचे दागिने व नगदी असा एकुण किंमती 3,90,040/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शेख महंमद गयासोदिन शेख महंमद अजिजोदिन वय 57 वर्षे, व्यवसाय व्यापार रा प्रफुल्लनगर चिखलवाडी भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 232/2022 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री अनिल कांबळे, मो.क्रं. 9096254358** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**हिमायतनगर :–**दिनांक 25.06.2022 रोजी पहाटे 03.22 वा. चे सुमारास, **मौजे पारवा खुर्द शिवारातील रुद्रानी इनफ्रास्टक्चर कॅम्प साताशय हनुमान मंदीर समोर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांना सेक्युरीटी गार्ड नागोराव पवार यांनी फोन करुन चोर आलेत हुशार रहा असे कळविले व त्याचे पाच ते दहा मिनीटांनी फिर्यादीचे रुम बाहेर अज्ञात चार माणसे येवून त्यांनी अचानक दगडफेक सुरु केली ते आत येवु नये म्हणुन फिर्यादी व त्यांचे सोबती असे दोघांनी दरवाजा पक्का धरुन ठेवला परंतु आरोपीतांनी त्यांच्या दरवाजा वर लाथा व कुऱ्हाडीने मारुन आत घुसले व पैसे दया नाहीतर मारुन टाकु अशी धमकी दिली, त्यापैकी एकाने फिर्यादीच्या डोक्यात जेवणाचे स्टिलचा टिफीनचा डब्बा मारुन जखमी केले व हॅगरवर असलेल्या पॅटच्या खिशातुन नगदी 2000/– रुपये व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती 5000/– रुपयेचा व सोबतचे चिंटु भाई यांचे पाकीटातुन नगदी 1500/– रुपये आणि ओपो रेनोव्हो कंपनीचा मोबाईल किंमती 8000/– रुपयाचा असा एकुण किंमती 16,500/–रुपयाचा माल जबरीने चोरुन नेला व इरटिगा गाडीचे काच फोडुन नुकसान केले. वगैरे **फिर्यादी दगडु बन्सी ओहळ, वय 40 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. रुद्रानी इनफ्रास्टक्चर कॅम्प साताशय हनुमान मंदीर समोर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 156/2022 कलम 392,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्र. 9689707038** हे करीत आहेत.

## 3)खंडणी :–

**देगलुर :–**दिनांक 21.08.2021 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **जुनी नगर परिषद देगलुर च्या गेट जवळ, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादीस तुमचे स्वच्छतेचे कामे बरोबर नाहीत माहिती अधिकार मध्ये कामाची मागणी न करण्यासाठी व तक्रार न करण्यासाठी 10000/–रुपयाची खंडणी मागतली व 10000/– रुपये खंडणी घेतली, नौकरी घालवण्याची धमकी दिल्याने आज रोजी तक्रार दिली आहे. वगैरे **फिर्यादी मारोती हाजेप्पाराव गायकवाड, वय 58 वर्षे, व्यवसाय नौकरी स्वच्छता निरीक्षक न.प. कार्यालय देगलुर रा. नगरेश्वर नगर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 310/2022 कलम 385,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मोरे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 01.01.2018 ते दिनांक 03.08.2020 रोजी पावेतो, **जावईनगर नायगाव ता. नायगाव जि. नांदेड ह. मु. गुरुवार बाजार सिडको, नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तुझ्या घरच्यांनी लग्नात फ्रिज,सोफा,टीव्ही, इत्यादी वस्तु दिल्या नाहीत असे म्हणुन शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व मानसिक त्रास दिला व माहेरहुन एक लाख रुपये घेवुन ये नाहीतर जाळुन टाकु असे जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 25 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 376/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1912 तिडके, मो.क्रं. 9421394862** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)भोकर :–** दिनांक 25.06.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मौजे थेरबन येथील शंकर घिसाडी यांचे घराजवळील चिंचेच्या झाडाखाली भोकर, ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना 4700/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोह/1765 संभाजी विठ्ठलराव हनुमंते, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 231/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1653 देवकांबळे, मो.क्र. 02467–222623** हे करीत आहेत.

**2)मुखेड :—** दिनांक 25.06.2022 रोजी 16.10 वा. चे सुमारास, **मौजे बेळी शिवारातील केशव इंगोले यांच्या शेताजवळील खदानी जवळ ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या पैसे लावुन चितपट नावाचा जुगार खेळत खेळवित असतांना 1741/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गजानन विजय आनसापुरे, ने. पोस्टे मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 199/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1001 जाधव, मो.क्र. 7030066459** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र.  252/2022    दिनांक : 26.06.2022

## पोलीस अधिक्षक कार्यालयात " राजर्षि शाहू महाराज " यांची जयंती साजरी

26 जुन 2022 रोजी रविवार **"राजर्षि शाहू महाराज"** यांची जयंती **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. या प्रसंगी **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच **श्री व्दाकादास चिखलीकर,** पोनि स्थागुशा, नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, **श्री जी.व्ही. गाडेकर**, पोउपनि नियंत्रण कक्ष नांदेड **इतर** शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सपोउपनि सुर्यभान कागणे, पोना संजय सांगवीकर, पोकॉ विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे आयोजन केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

